महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित

महावितरण

औद्योगिक संबंध विभाग, प्रकाशगड,
४ था मजला, प्लॉट जी - ९, वांद्रे (पूर्व), मुंबई - ५१.
दूरध्वनी क्र. २६४७२१३१ / २६४७४२११


जा.क्र. : औसंवि/अ/ २३८८० दिनांक : २३/०८/२०१२

## परिपत्रक

**विषय : कंत्राटी पध्दतीवर काम करणाऱ्या कामगारांना किमान वेतन मिळण्यासाठी प्रभावीपणे अमलात आणावयाच्या उपाययोजना / निर्देश.**

संदर्भ : सांघिक कार्यालयाचे परिपत्रक काऔसंवि/अ/३३१७ दि. ०१/०२/२०१०

**********

महावितरण कंपनीमध्ये कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या कामगारांना किमान वेतन देण्याबाबत सांघिक कार्यालयाकडून वेळोवेळी विविध परिपत्रकाद्वारे निर्देशित करण्यात आले होते. क्षेत्रीय कार्यालयांना स्पष्ट निर्देश देण्यात येऊन देखील विविध कामगार कायद्यान्वये बंधनकारक असणाऱ्या तरतुदींचे पालन ठेकेदारांकडून केले जात नाही, कंत्राटी कामगारांना नियमाप्रमाणे व वेळेवर वेतन मिळत नाही इत्यादी प्रकारच्या तक्रारी विविध संघटना तसेच कंत्राटी कामगारांमार्फत सांघिक कार्यालयाकडे प्राप्त झाल्या आहेत. त्यानुषंगाने कंत्राटी पध्दतीने काम करणाऱ्या कामगारांना विविध कामगार कायद्यान्वये बंधनकारक असणाऱ्या तरतुदींचा प्रभावीपणे वापर करुन किमान वेतन कंत्राटी कामगारास मिळण्याची प्रक्रिया व त्यामध्ये असणाऱ्या त्रुटी दूर करण्यासाठी करावयाच्या उपाययोजना सूचविण्यासाठी विशेष समितीचे गठन सांघिक कार्यालय स्तरावर करण्यात आले. सदर समितीने याबाबतचा सविस्तर अभ्यास करुन करावयाच्या परिणामकारक उपाययोजनाचा अहवाल व्यवस्थापनास सादर केला आहे.

व्यवस्थापकीय संचालक यांनी मुख्य विधी सल्लागार, कार्यकारी संचालक (मा.सं.), संचालक (संचलन) आणि संचालक (वित्त) यांचेशी विचारविनिमय करुन कंत्राटी पध्दतीवर काम करणाऱ्या कामगारांना किमान वेतन मिळण्यासाठी प्रभावीपणे उपाययोजना अमलात आणण्यासाठी खालीलप्रमाणे निर्देश दिले आहेत.

**अ) प्रशासकीय निर्णय :**

१) कंत्राटी पध्दतीवर घ्यावयाचे / नियुक्त करावयाचे कामगार फक्त निविदा प्रक्रियेच्या माध्यमातूनच घेण्यात / नियुक्त करण्यात यावे. कंत्राटी कामगारांची निविदा (Tender) काढण्याची व त्यासंदर्भात कामाचा आदेश (Work Order) देण्याचे अधिकार अधीक्षक अभियंता तथा समकक्ष पदावरील व त्यावरील अधिकाऱ्यांपर्यंतच मर्यादित राहतील. संबंधित अधीक्षक अभियंता यांनी त्यांचे कार्यक्षेत्रातील कार्यकारी अभियंता, उप कार्यकारी अभियंता, यांचेकडून पुढील काळासाठी किती मनुष्यबळाची गरज आहे याचा अहवाल मागवून कंपनीच्या नियमानुसार मंडलस्तरावर एकत्रितरित्या निविदा काढावी.

२) सदर निविदा मंडलस्तरावरुन काढलेली असली तरी ठेकेदाराने विभाग स्तरावर नियमाप्रमाणे वेळेत कंत्राटी कामगारांना किमान वेतन व अनुषंगिक भत्ते दिले पाहिजे अशी स्पष्ट अट निविदेमध्ये / कामाच्या आदेशामध्ये टाकण्यात यावी. अधीक्षक अभियंता हे मुख्य मालक (Principle Employer) असल्याने त्यांनी मुख्य मालकाचा प्रतिनिधी म्हणून मंडलस्तरावर एक सहाय्यक अभियंता व विभागस्तरावर एक कनिष्ठ अभियंता यांची नियुक्ती करुन त्याबाबत लेखी आदेश द्यावेत. सदर प्रतिनिधी किमान वेतन कायद्याबाबतच्या सांघिक कार्यालयाच्या परिपत्रकातील तरतुदींचे प्रभावीपणे पालन होते की नाही याची शहानिशा करतील.

३) कंत्राटी कामगारांना वेळेवर वेतन देण्याच्या दृष्टीने फक्त कंत्राटी कामगारांच्या बाबतीतच द्यावयाच्या मासिक वेतन देयकांची (बिलांची) **M.B. Recording** करण्याची आवश्यकता नाही.

४) कंत्राटी कामगारांना द्यावयाच्या मासिक वेतनाच्या बिलाचा निधी आवश्यकतेनुसार सांघिक कार्यालयाकडे प्रपत्र-३ ऐवजी प्रपत्र-१ (Proforma-I Priority Items) मध्येच दरमहा करण्यात यावा जेणेकरुन कंत्राटी कामगारांना वेळेवर वेतन अदा करणे सोयीचे होईल.

५) कंत्राटी कामगारांचे वेतन धनादेशाद्वारे वेळेवरच त्यांच्या बँक खात्यावर ठेकेदाराने जमा करावे.

**ब) मुख्य मालकाने (Principal Employer) पार पाडावयाची कर्तव्ये :**

१) कंत्राटी कामगार नियुक्त करण्याबाबत निविदा मागविताना खालील महत्वाचे मुद्दे निविदेमध्ये येणे अत्यावश्यक आहे.

तांत्रिक निविदा (Technical Bid) :

१) निविदा सादर करणाऱ्या संस्थेचे नाव व संपूर्ण पत्ता
२) ठेकेदाराचे नाव त्याचा कायम स्वरुपी पत्ता व रहिवासाचा पुरावा
३) कंत्राटी कामगार पुरविण्याचा परवाना (License)
४) कामगार राज्य विमा योजना लागू असल्यास कामगार राज्य विमा योजनेचा कोड नंबर
५) भविष्य निर्वाह निधीचा कोड नंबर
६) कंत्राटदाराच्या बँकेचे नाव, संपूर्ण पत्ता व खाते क्रमांक

वरील सर्व कागदपत्रांशिवाय कुठलीही निविदा ग्राह्य धरण्यात येऊ नये.

मूल्य निविदा (Price Bid) :

१) कंत्राटी कामगारांच्या निविदेतील लोडिंग मध्ये सुसूत्रता व समानता राहील याकरिता कंत्राटी कामगारांच्या वेतनासंदर्भात सांघिक कार्यालयाचे परिपत्रक क्र.काऔसंवि/अ/३३१७ दि.०१/०२/२०१० अन्वये ४२% लोडिंगचा (Loading) समावेश असावा असे निर्देशित केलेले होते.

| | | |
|---|---|---|
| (१) भविष्य निर्वाह निधीचा ठेकेदाराचा वाटा (Basic + Spl.Allow.) | - | १२% |
| (२) भविष्य निर्वाह निधीच्या प्रशासकीय खर्चासाठी | - | १.६१% |
| (३) बोनस (बोनस कायद्यानुसार रु. ३५००/- मर्यादित वेतनावर) | - | ८.३३% |
| (४) घरभाडे भत्ता (महाराष्ट्र किमान घरभाडे भत्ता अधिनियम १९८३ व १९९०(Basic) (ज्या कंत्राटी कामगारांने एक महिन्यापेक्षा कमी काम केले त्यांना प्रोरेटा पध्दतीने घरभाडे भत्ता देण्यात यावा.) | - | ५% |
| (५) कामगार राज्य विमा योजना योगदान (Basic + Spl.Allow. + HRA) (ज्या ठिकाणी कामगार राज्य विमा योजना लागू आहे तेथे | - | ४.७५% |
| (६) विमा व कामगार नुकसान भरपाईकरिता खर्च (ज्या ठिकाणी कामगार राज्य विमा योजना लागू नाही तेथे) | - | १% |
| (७) रजा रोखीकरण (Paid leave contribution) (Basic + Spl.All.) (२१ दिवसांच्या कामा मागे एक दिवसाच्या रजेचा पगार ) | - | ४% |
| (८) सुरक्षिततेच्या साधनसामुग्रीकरिता | - | १% |
| (९) ठेकेदाराचा नफा | - | ५% |
| | | ४१.६९% |

ज्या ठिकाणी कामगार राज्य विमा योजना लागू आहे त्या ठिकाणी एकूण लोंडीग ४२% (पूर्णांकात)
ज्या ठिकाणी कामगार राज्य विमा योजना लागू नाही त्या ठिकाणी एकूण लोंडीग ३८% (पूर्णांकात)

२) कंत्राटी कामगारांच्या किमान वेतनाबाबत संदर्भीय परिपत्रकात नमूद केलेले कमीत कमी ४२% लोडींग असल्याशिवाय कुठल्याही परिस्थितीत सदर निविदा ग्राह्य धरण्यात येऊ नये.

२) ज्या-ज्या वेळेस शासनाच्या अधिसूचनेनुसार किमान वेतनात व विशेष भत्त्यामध्ये वाढ करण्यात येईल त्या-त्या वेळेस सदर वाढ लागू झाल्याच्या तारखेपासून ती वाढ कंत्राटी कामगारांना लागू राहील. वेतनात वाढ झालेल्या फरकाची रक्कम ठेकेदाराने सुधारित दराने बिल सादर केल्यानंतर तातडीने अदा करण्यात येऊन सदर फरकाची रक्कम कंत्राटी कामगारांना पुढील वेतनात विनाविलंब देण्याबाबत दक्षता घ्यावी.

३) ठेकेदाराच्या बिलाचे परीक्षण लेखापरीक्षकाकडून करताना ठेकेदाराने विविध कायद्यान्वये बंधनकारक असणाऱ्या सर्व तरतुदींचे पालन केले असल्याची खात्री करुनच बिल अदा करावे. ठेकेदाराला बिल अदा केल्यानंतर कायद्यान्वये बंधनकारक असलेल्या तरतुदींचे उल्लंघन झाल्याचे निदर्शनास आल्यास संबंधित सक्षम अधिकारी व लेखापरीक्षण करणारा कर्मचारीवर्ग यांना जबाबदार धरण्यात येऊन त्यांच्यावर शिस्तभंगाची कारवाई करण्यात येईल.

४) ठेकेदाराचा कंत्राटाचा कालावधी समाप्त झाल्यास अथवा रद्द केल्यास कंत्राटी कामगारांची भ.नि.नि. मधील रक्कम काढणे (P.F. Withdrawal) करिताचा फॉर्म भरुन देणे ठेकेदारावर बंधनकारक राहील. सदर फॉर्म (P.F. Withdrawal) भरुन दिल्याशिवाय ठेकेदाराची सुरक्षा अनामत रक्कम देण्यात येऊ नये.

५) मुख्य मालकाचे प्रतिनिधी म्हणून नेमलेले सहाय्यक अभियंता / कनिष्ठ अभियंता हे ठेकेदाराच्या कामगाराने एका महिन्यात प्रत्यक्ष किती दिवस काम केले याबाबत संबंधित अधिकाऱ्यांकडून नोंदी पाहून ठेकेदाराने कार्यालयास बील सादर केल्यावर ठेकेदाराच्या प्रत्येक कामगाराची उपस्थिती त्याप्रमाणे आहे किंवा नाही याची खातरजमा करुन त्याप्रमाणे अभिप्राय देतील.

६) विविध कायद्यान्वये बंधनकारक असणाऱ्या तरतुदींचे उल्लंघन करणाऱ्या ठेकेदाराचा काळ्या यादीत (Blacklist) समावेश करण्यात यावा.

**क) ठेकेदाराने पार पाडावयाची कर्तव्ये :**

१) ठेकेदाराने वेतन देयक (Bill) दरमहा ०३ तारखेपर्यंत सादर करावे.

२) ठेकेदाराने प्रत्येक कामाची / कंत्राटाची स्वतंत्र हजेरीपत्रक व वेतन नोंदवही (Muster cum Wage Register) करावी.

३) ठेकेदाराने कंत्राटी कामगारास नियुक्त केलेल्या तारखेपासून त्वरीत भविष्य निर्वाह निधी क्रमांक (P.F. No.) आणि कामगार राज्य विमा योजनेचा क्रमांक व ओळखपत्र (E.S.I. Card) कामगारांना द्यावे.

४) मूळ वेतन व विशेष भत्ता मिळून येणाऱ्या रकमेवर भ.नि.नि.ची वर्गणी (P.F. Contribution) व मूळ वेतन व विशेषभत्ता अधिक घरभाडेभत्ता मिळून येणाऱ्या रकमेवर कामगार राज्य विमा योजनेची वर्गणी (E.S.I. Contribution) इत्यादी ठेकेदाराने करावी.

५) बोनस कायद्यानुसार ठेकेदाराने कंत्राटी कामगारांना दरवर्षी ऑक्टोबर महिन्यामध्ये बोनस अदा करावा.

६) मासिक वेतन चिठ्ठीमध्ये एकूण वेतन म्हणजे मूळ वेतन + विशेष भत्ता + घरभाडे भत्ता + रजेचा पगार (Leave Salary) व एकूण कपात म्हणजे भ.नि.नि.(P.F. Contribution) + का.रा.वि.यो. (E.S.I. Contribution) + व्यवसाय कर (P.Tax) याचा समावेश असलेली वेतन चिठ्ठी (Pay Slip) दरमहा ठेकेदाराने कंत्राटी कामगारांना द्यावी.

७) सुसूत्रता व समानता राखण्यासाठी ठेकेदाराने प्रत्येक कामाच्या आदेशान्वये स्वतंत्र वेतन नोंदवही ठेवावी. सदर वेतन नोंदवही (Muster cum Wage Register) चा नमुना सोबत जोडला आहे.

८) ठेकेदाराने कंत्राटी कामगारांचे वेतन धनादेशाद्वारे विहित मुदतीत म्हणजेच दर महिन्याच्या ०७ तारखेपर्यंत कामगारांच्या बँक खात्यावर जमा करावे.

**ड) इतर अनुषंगिक बाबी :**

१) उप मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी यांनी मंडल कार्यालयास दर तीन महिन्यांनी भेट द्यावी. त्यावेळी कंत्राटी कामगार व त्यांना देण्यात येणाऱ्या वेतनाबाबत व इतर अनुषंगिक विषयांबाबत मुख्य मालक म्हणजे अधीक्षक अभियंता तसेच मालक प्रतिनिधी म्हणून नेमलेले सहाय्यक अभियंता / कनिष्ठ अभियंता यांनी माहिती द्यावी व त्याबाबतचा अहवाल उप मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी यांनी मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी यांना द्यावा.

२) त्रुटी असल्यास त्यात सुधारणा न झाल्यास व त्याबाबत उप मुख्य औद्योगिक संबंध अधिकारी यांनी गंभीर मत नोंदविल्यास संबंधित सक्षम अधिकारी यांना जबाबदार धरले जाईल. मुख्य मालकाचे प्रतिनिधी म्हणून संबंधित सहाय्यक अभियंता / कनिष्ठ अभियंता यांनी त्यांचे काम योग्य पध्दतीने पार पडले नाही असे आढळून आल्यास त्यांना देखील जबाबदार धरले जाईल.

दि. ०१/१०/२०१२ पासून या परिपत्रकातील तरतुदी लागू होतील. कंत्राटी पध्दतीवर काम करणाऱ्या कामगारांना किमान वेतन मिळण्यासाठी वरीलप्रमाणे निर्देशित केलेल्या उपाययोजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करण्यात यावी.

राहुल गोवर्धन

(कर्नल राहुल गोवर्धन)
कार्यकारी संचालक (मा.सं.)

प्रत : प्रेषण यादी प्रमाणे क्षेत्रीय कार्यालयातील कार्यकारी अभियंता स्तरापर्यंत.

# Muster cum Wage Register Format

Name Of Agency:

Muster cum Wage Register for the Month of -2012 Work Order no:- Dt. Period of Order from to

| Basic Information | | | | | | | | | | | Actual | | | | | Deduction | | | | Net | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| Sr. No | Full Name of Contract Labour | Design. & Actual Place of Working | Catogry Skilled/ Semi-Skilled / UnSkilled | Zone I,II,III | P.F No | ESIC NO | Basic Pay | Sp. All. (1/7/12 to 31/12/12) | HRA 5% | Leave salary 4% | No Of Days Present | Basic + SP.ALL. | HRA 5% (Basic+ SP.All.) | Leave salary 4% | Total Earning | P.F 12% | ESIC 1.75% | Other P. Tax | Total Ded. | Salary | Signature of Employee | Cheque No & Date | Sign. Authoriesed person of MSEDCL |
| 1 | 2 | 3 | 4 | 5 | 6 | 7 | 8 | 9 | 10 | 11 | 12 | 13 | 14 | 15 | 16 | 17 | 18 | 19 | 20 | 21 | 22 | 23 | 24 |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |
| | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | | |

Remark : 1) Same points to be reflect in Pay Slip.

2) The areas where ESIC is not applicable, deduction @ 1.75% will not apply.